# प्रकरण - पहिले

# महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेची पार्श्वभूमी

# प्रकरण - पहिले

# ''महाराष्ट्रातील शेतकरी संघटनेची पार्श्वभूमी''

**प्रस्तावना :**

भारत हा शेतीप्रधान देश आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया आहे. पूर्वी शेतीचा मुख्य उद्देश हा अन्नधान्याची पूर्तता करणे व त्याद्वारे उदरनिर्वाह करणे हा होता. शेती व्यवसायास जोडधंदा म्हणून पशुपालन व दुग्धोत्पादनासारखा दुय्यम व्यवसायसुद्धा होता. शेतीच्या विकासामध्ये वेगवेगळ्या टप्प्यांवर नवनवीन बदल होत गेले. आणि शेती विकासासाठी चालना मिळत गेली. मध्ययुगामध्ये शेतीने नवे स्वरूप धारण केले. तत्कालीन शासनकर्त्यांनी शेतीच्या विकासासाठी काही प्रयत्न केले. परंतू ते पुरेसे नव्हते. शेती सोडून इतर क्षेत्रांत फारशी प्रगती न झाल्याने शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या वाढत जाऊन शेतीवर अतिरिक्त भार पडलेला दिसून येतो. यातूनच शेतसारा, शेतीमालाचा योग्य व किफायतशीर भाव आणि असंख्य प्रश्नांमुळे शेतकऱ्यांवर अन्याय होत होता. या अन्यायाविरोधात शेतकऱ्यांनी संघटीत होवून आंदोलने केली. ही आंदोलने स्वातंत्र्यपूर्व काळापासून होत आहेत ती पुढील प्रमाणे.

**अ ) भारतातील स्वातंत्र्यापूर्वीची शेतकरी आंदोलने :**

भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश शासन, सावकार आणि जमिनदार यांच्या अन्यायी धोरणाविरोधी शेतकऱ्यांनी आंदोलने केली ती पुढीलप्रमाणे.

**१८६७ बंगाल व बिहार मधील नीळ उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन :**

भारतामध्ये बंगाल व बिहार या प्रांतात नीळ पीकाचे उत्पादन शेतकऱ्यांवर सक्ती करून घेतले जात होते. नीळ उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय होत होता. या अन्याया विरोधात चंपारण्यातील शेतकरी संघटीत होवू लागले. त्यांनी एकत्र येवून जमिनदारांविरोधात लढा दिला. त्याचा पहिला उद्रेक म्हणजे १८६७ मध्ये केलेले आंदोलन होय. या लढ्यामुळे शेतकरी वर्गाला त्यांच्या नीळीस थोडीफार किंमत वाढवून मिळाली.

**१८७३-७४ चा दख्खनचा उठाव :**

भारतामध्ये इंग्रजांची राजवट सुरू झाल्यानंतर सावकारशाहीचे समाजावर वर्चस्व वाढले. इंग्रजांनी १८६८ साली शेतसाऱ्यात वाढ केली. त्या काळातच बाजारात धान्याच्या किंमती कोसळल्या. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यांच्या जमिनी सावकारांच्या घशात गेल्या. त्यामुळे १८७३-७४ साली महाराष्ट्रातही शेतकऱ्यांनी उठाव केले. यालाच 'दख्खनचे उठाव' असे म्हणतात. या उठावाच्या काळात शेतकऱ्यांनी सावकार, जमिनदार यांच्या घरावर हल्ले केले. त्यांच्या चीजवस्तू लुटल्या आणि कागदपत्रांची जाळपोळ केली.[१]

**१८७७-७८ चा मुंबई प्रांतातील दुष्काळ :**

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ पडला. या दुष्काळाची झळ महाराष्ट्राला पोहचली. १८७७-७८ मध्ये मुंबई प्रांताच्या दक्षिण भागात भयंकर दुष्काळ पडला. या दुष्काळामध्ये पाच ते सहा लाख लोक भुकेने तडपडून मेले होते. त्यामुळे जनतेची क्रयशक्ती संपुष्ठात आली. मुंबई प्रांतात पडलेल्या दुष्काळामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या लोकांची संख्या पुढीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. १.१**

**१९७७-७८ साली मुंबई प्रांतातील दुष्काळामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या लोकांची संख्या**

| क्र. | वर्ष | मृत्यूमुखी लोकांची संख्या |
|---|---|---|
| १. | १८०० ते १८२५ | १०,००,००० |
| २. | १८२५ ते १८५० | ४,००,००० |
| ३. | १८५० ते १८७५ | ५०,००,००० |
| ४. | १८७५ ते १९०० | १,५०,००० |

एवढे लोक दुष्काळात मृत्यूमुखी पडले होते.[२] या दुष्काळामुळे शेतीव्यवसायावर संकट आले होते.

**महात्मा फुले यांची शेतकरी आंदोलनातील भूमिका :**

शेतकरी हा देशाचा पोशिंदा आहे. ह्या ठोस भूमिकेतून फुले यांनी सन १८७३ रोजी 'शेतकऱ्यांचा असूड' हा ग्रंथ लिहिला. शेती व शेतकरी यांच्याबद्दल फुलेंनी एकत्रीत विचार मांडले आहेत. फुले म्हणतात की, 'एखादे वर्षी पाऊस न पडल्यामुळे मुळीच शेतात पीके होत नाहीत. कधी कधी बैलांची संख्या पुरेशी नसल्यामुळे कित्येकांच्या पेरणीचा वाफ बरोबर न साधता पीकास धक्का बसतो. कधी कधी बी-बियाणे विकत घेण्यापुरते पैसे सावकारांनी वेळेस न दिल्यामुळे अथवा उधार आणलेले जूने बी पेरल्यामुळे कित्येकांच्या पीकास धक्का बसतो. अशा नाना प्रकारच्या सुलतानी व अस्मानी अरिष्ठांमुळे शेतीत पीक न झाल्यास शेतकऱ्यांपैकी एकटा दुकटा शेतकरी ब्राह्मण सरकारी कामगारांच्या घरी एकांती त्यास पीकांची सविस्तर हकिकत कळवत असे.[३] मात्र शेतकरी ज्यावेळी सरकारी कामगारांना सांगत असे. त्यावेळी सरकारी कामगारांना वेळ नसे व विविध कारणे सांगून सरकारी कामगार हे शेतकऱ्यांना परत पाठवत असत.

सरकारी कर्मचारी ज्याप्रमाणे शेतकऱ्यांचे शोषण करत आहेत. त्याप्रमाणे भटब्राह्मण, मारवाडी व सावकार हे शेतकऱ्यांची पिळवणूक करत होते. त्यामुळे शेतकरी वर्ग भरडला जात होता. शेतकऱ्यांचे दैनंदिन जीवन जगणे नामुष्कीचे झाले होते. हे अन्याय दूर करण्यासाठी शेतकऱ्यांना एकत्रीत आणण्याचे महात्मा फुलेंनी प्रयत्न केले आणि शेतकऱ्यांवर होणाऱ्या जूलमी सावकारी विरोधात लढा देण्यासाठी पुणे व नगर जिल्ह्यांत त्यांनी शेतकऱ्यांचे बंड घडवून आणले. या बंडास 'खतफोडीचे बंड' असे म्हणतात. जून्नर तालूक्यात फुलेंनी शेतकऱ्यांना कर न भरण्याचे सांगितले. अशा प्रकारे फुलेंनी खतफोडीचे बंड केले. आणि फुले वारंवार पडणाऱ्या दुष्काळविषयक विनंतीपत्रक जाहीर केले की, 'मेहेरबान पुणे, मुंबई वगैरे ठिकाणचे सभासद यांस वि. वि. समाजाचे हुकूमावरून आपणांस विनंतीपूर्वक असे कळविण्यात

येते की, समाज मार्फत 'व्हिक्टोरिया बालाश्रम' स्थापन केले आहे. दुष्काळपीडीत लोक आपली मुले सोडून जाऊ लागले आहेत व त्याप्रमाणे इंदापूर, मिरज व तासगांवकडील ब्राह्मणजात खेरिज करून बाकी सर्व जातींतील कित्येक अनाथ लोक आपली मुलेंबाळे घेऊन जमले आहेत. कधी कधी दोन-दोन, तीन-तीन दिवसांचे उपवास करून त्यांची हाडे मात्र उरली आहेत. शिवाय त्यांचे वस्त्रावाचून इतके हाल झाले आहेत की, त्याचे येथे वर्णन करण्यास मला दु:ख वाटते. यावरून आपण सर्व सभासदांनी व इतर दयावंत गृहस्थांनी कृपाळू होऊन आपल्या शक्तीनुसार काही ना काही तरी ही जाहिरात पाहताच मदत पाठविण्याची त्वरा केल्यास आपण आपले कर्तव्यकर्म अशा वेळी बजावल्याचे श्रेय होणार आहे.'[४]

१८८८ मध्ये ड्यूक ऑफ कनॉट यांनी हिंदूस्थानला भेट दिली. त्यावेळी पुणे येथे मानपत्र देण्याचा समारंभ झाला. या समारंभास महात्मा फुले उपस्थित होते. त्यावेळी फुले शेतकऱ्यांच्या पोशाखात म्हणजे डोक्यास मुंडासे, साधा अंगरखा, खांद्यावर धोंगडी, हातात काठी व पायात फाटक्या वहाना घालून भेटीस गेले होते. समारंभात फुलेंनी दाखवून दिले की, याठिकाणी उत्तम पोशाख करून उपस्थित असलेले लोक हिंदूस्थानच्या जनतेचे प्रतिनिधी नाहीत. तर या देशातील बहुसंख्य जनता शेतकरी आहे. आणि शेतकऱ्यांच्या पोशाखात फुले भेटीस गेले होते. पुढे १८९० मध्ये महात्मा फुलेंचा मृत्यू झाला. यानंतर १८९५ साली जेंव्हा काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. तेंव्हा महात्मा फुलेंचे सहकारी श्री. कृष्णराव भालेकर यांनी काँग्रेसच्या सभामंडपात दारिद्र्याने ग्रासलेल्या शेतकऱ्याचा पुतळा नेला होता व पुतळ्याशेजारील फलकावर असे लिहिले होते की, '१९ कोटी शेतकऱ्यांच्या दु:खांना वाचा फोडण्यासाठी येथे १९ जण तरी आहेत का?'[५] यावरून आपणांस शेतकऱ्यांची परिस्थिती समजून येते. अशाप्रकारे महात्मा फुलेंनी शेती व शेतकरी विषयक कार्य केले. पुढे या काळात शेतकरी, कामगारांच्या संख्येत सतत वाढ होत गेली. शेतीबरोबर

खाणी व रेल्वे उद्योगांची संथ वाढ होत होती. सुरूवातीपासूनच ब्रिटिश शासन शेतकरी व कामगारांची अमानुषपणे पिळवणूक करत होते. अल्पमजूरी, जाचक शेतसारा यामुळे शेतकरी व कामगारांना जगणे असह्य झाले होते. अशा परिस्थितीत एका अखिल भारतीय संघटनेची गरज होती. त्यावेळी भारतात राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली होती व या राष्ट्रीय काँग्रेसने शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्यास सुरूवात केली होती. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

**भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि शेतकऱ्यांचे प्रश्न :**

इंग्रजांचे साम्राज्य हे व्यापारी साम्राज्य होते. व्यापार वाढीसाठी त्यांनी रस्ते बांधले, बंदरे बांधली व कच्चा माल इंग्लंडमध्ये पाठवून त्यापासून पक्का माल भारतात आणला व महाग दराने विकू लागले. याचा परिणाम म्हणजे भारतातील उद्योगधंदे बुडाले. शहरांतील कारागीर वर्ग बेकार बनला. व तो खेड्यातील शेतीकडे वळला. पूर्वी खेड्यात शेती व हस्तव्यवसाय यांची सांगड होती. नव्या राजवटीत ही सांगड तूटली. हस्तव्यवसाय नष्ट झाले. सर्वजण शेतीच्या मागे लागले. त्यामूळे भारताची आर्थिक पिळवणूक होवू लागली. 'बंगाल, बिहार, आसाम या प्रांतात चहा व नीळीचे मळे यूरोपियन मालकांच्या हाती होते. या मळ्यावर काम करणाऱ्या मजुरांना गुलामांप्रमाणे वागविले जई. त्यांच्यावरील होणाऱ्या अन्यायाविरोधी बंगालमधील नीळ मळ्यांतील मजूरांनी आंदोलन सुरू केले होते. या आंदोलनाने मोठी राजकीय जागृती घडवून आणली होती.[६] इंग्रज राज्यकर्त्यांकडून आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची दाद मिळवून देशप्रेमी लोकांनी अनेक संघटना स्थापन केल्या होत्या. मात्र देशाचे प्रतिनिधित्व करणारी एखादी अखिल भारतीय राजकीय संस्था निर्माण झालेली नव्हती. आणि सर्व सामान्य कष्टकरी आणि शेतकऱ्यांची दु:खे प्राचीन असली तरी वेगवेगळया काळात त्यांना वेगवेगळ्या संकटांना तोंड द्यावे लागते. भारतीयांचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि स्वराज्य प्राप्तीसाठी व हिंदी लोकांची दु:खे, त्यांची होणारी पिळवणूक

थांबविण्यासाठी 'राष्ट्रीय काँग्रेसची' स्थापना १८८५ मध्ये झाली.[८] या राष्ट्रीय काँग्रेसचे पहिले अध्यक्ष उमेशचंद्र बॅनर्जी यांनी राष्ट्रीय सभेची धोरणे जाहिर केली. त्यामध्ये जमीनदारांच्या जुलूमापासून रयतेचे संरक्षण व्हावे, जमीन महसूल कमी करावा, कमी दरामध्ये शेतकऱ्यांना कर्ज देणाऱ्या ग्रामिण बँका स्थापन कराव्यात.[९] या मागण्यांचा समावेश केला होता. मात्र भारतीय राष्ट्रीय सभा अर्ज, विनंती, तक्रारी या मार्गाने ब्रिटिश शासनासमोर निवेदने देत होती. ब्रिटिश शासन याकडे दुर्लक्ष करत होते. शेतकऱ्यांची पिळवणूक करत होते. १९व्या शतकाच्या पहिल्या दशकाच्या सुरूवातीस बिहार येथील नीळ उत्पादकांनी या पिळवणूकीविरोधी आवाज उठवला. तो म्हणजे १९०६ चा चंपारण्य सत्याग्रह होय.

**१९०६ चा चंपारण्य सत्याग्रह :**

चंपारण्य मधील किसानांनी 'नीळ पिकवायची नाही' असा निर्धार करून त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधात शेतकऱ्यांना संघटीत करण्यास सुरूवात केली. एकाच वेळी सर्वत्र नीळ पेरण्यास शेतकऱ्यांनी नकार दिला पाहिजे. नीळीच्या पीकाऐवजी शेतकऱ्यांनी आपल्या स्र्व शेतातून अन्नधान्याची लागवड करण्याचे ठरवले. व निळीचे उत्पादन घेण्याचे बंद करण्यास सुरूवात केली. तरीही नीळ उत्पादकांवर अन्याय होत होता. सक्तीने नीळीचे उत्पादन घेतले जात होते. या होणाऱ्या अन्यायाचे निवारण करण्यासाठी संघटनेची गरज होती व संघटनेशिवाय हे उद्दिष्ट प्राप्त करून घेणे शक्य नव्हते. या लढ्याचे नेतृत्व शेख गुलाब व राजकुमार शुक्ला यांनी केले. पुढे हे आंदोलन असफल झाले इंग्रज सरकारने या नेत्यांना तुरूंगात टाकले. यानंतर नीळ उत्पादकांच्या समस्या समजावून घेण्यास महात्मा गांधींनी १९१७ साली चंपारण्य दौरा केला. आणि तेथील शेतकऱ्यांच्या समस्या समजावून घेतल्या व लढ्याचे नेतृत्व त्यांनी स्विकारले. मात्र ब्रिटीश सरकारने गांधीजींना अटक केली. त्यावेळी गांधीजींनी शेतकऱ्यांना सांगितले की, मवाळ मार्गाने आंदोलन चालू ठेवा. पुढे हे आंदोलन चालू राहिले. याचा परिणाम म्हणजे ब्रिटीश सरकारने 'चंपारण्य ॲग्रेरियन ॲक्ट' केला.

त्यामध्ये अशा तरतूदी होत्या की, शेतकऱ्यांवर नीळ पेरण्याची सक्ती केली जाणार नाही. कुळांना वाटले तरच ते नीळ पेरू शकतात. जमिनदारांनी नीळ पिकविण्यास जबरदस्ती केली तर त्यांना शासन करण्यात येईल.[११] याप्रकारे ब्रिटिश शासनाने कायदे केले असले तरी संपूर्ण भारतात त्यांना हा बदल नको होता. त्यामुळे भारतात विविध ठिकाणी शेतकऱ्यांचे उठाव झाले. त्यापैकी एक म्हणजे खेडा सत्याग्रह होय.

**१९१७-१८ चा खेडा सत्याग्रह :**

गुजरात राज्यातील खेडा या जिल्ह्यात १९१७-१८ मध्ये दुष्काळ पडला होता. म्हणून खेडा येथील शेतकऱ्यांनी त्या वर्षापूरता महसूल माफ करावा, अशी मागणी शासनाकडे केली होती. मात्र शासन त्याकडे दुर्लक्ष करत होते. हे गांधीजींच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांना असा सल्ला दिला की महसूल भरू नये. यावर शेवटी नाडियादच्या मामलेदारांनी निर्णय घेतला की, जर श्रीमंत शेतकरी सारा भरणार असतील तर गरिबांचा शेतसारा तहकूब करण्यात येईल.[१२] अशाप्रकारचे ब्रिटिश शासनाचे धोरण राहिले होते.

**१९२१ चे मोपल्यांचे बंड :**

दक्षिण केरळ मध्ये जमिनदार व सावकार शेतकऱ्यांची पिळवणूक करत होते. मोपल्यांचा केरळमधील जमिनदारी पद्धतीला विरोध होता. शेतीवर राबणाऱ्या कुळांना संरक्षण मिळावे ही मोपल्यांची मागणी होती. म्हणून त्यांनी एकत्रीत येवून १९२१ साली दक्षिण केरळात मलबा जिल्ह्यात जमिनदार व सावकारांविरोधात मोपल्यांनी बंड केले. या बंडामध्ये मोपल्यांनी जमिनदार वर्गावर हल्ले केले. मात्र जमिनदारांनी इंग्रज सरकारची मदत घेवून मोपली शेतकऱ्यांचे बंड मोडून काढले.[१३] त्यामुळे केरळमध्येच नव्हे तर संपूर्ण भारतीय शेतकऱ्यांच्यात असंतोष निर्माण झाला होता. त्यामुळे शेतकरी वर्ग अन्यायाविरोधात जागृत झाला होता. पुढे १९२०-२१ च्या मुळशी सत्याग्रहात शेतकऱ्यांच्यात निर्माण झालेली जाणीव व जागृती आपणांस दिसून येते.

### १९२०-२१ चा मुळशी सत्याग्रह :

महाराष्ट्रात पुणे जिल्ह्यातील मुळशी तालूक्यात टाटा कंपनीने धरण बांधण्याचे ठरविले. यावर शेतकऱ्यांनी त्यास विरोध करण्यास सुरूवात केली. मात्र सरकारने धरण बांधण्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेऊन टाटा कंपनीस देण्याचा निर्णय घेतला. म्हणजे शेतकऱ्यांचे उपजीविकेचे साधन असणारी जमीन शेतकऱ्यांकडून काढून घेण्याचा प्रयत्न झाला. त्यामूळे सेनापती बापट यांनी शेतकऱ्यांना संघटीत केले व सरकारच्या धोरणास विरोध करण्यासाठी व्यापक लढा उभारला. मुळशीतील या सत्याग्रह आंदोलनात शेतकऱ्यांनी धैर्याने भाग घेतला आणि सर्व हालअपेष्टा सोसल्या.[१४] याप्रकारे शेतकऱ्यांनी अन्यायाविरोधी लढा दिला.

### १९२८ चा बार्डोली सत्याग्रह :

१९२८ साली इंग्रज सरकारने गुजरातमधील शेतकऱ्यांच्या शेतसाऱ्याची फेरतपासणी करून शेतसाऱ्यात वाढ केली. ही वाढ शेतकऱ्यांना भरणे आर्थिकदृष्ट्या शक्य नव्हते. कारण अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची पीके ही साफ बुडाली होती. त्यामूळे आर्थिक परिस्थितीही हलाखीची झाली होती. त्यात सरकारने ३० टक्के शेतसारा वाढविला होता. त्याविरूद्ध शेतकरी संघटीत झाले. सरकारकडे गावोगावचे शेतकरी अर्ज, विनंती करून शेतसारा माफी मागू लागले. सरकारने त्यांच्या अर्ज, विनंत्यांना केराची टोपली दाखविली. त्यावेळी काही शेतकरी सरदार वल्लभभाई पटेलांकडे तक्रार घेवून गेले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची चांगली जाण सरदार पटेलांना होती. सरदार पटेलांनी शेतकऱ्यांना संघटीत करून बार्डोलीचा शेतसारा बंदीचा सत्याग्रह घडवून आणला व तो यशस्वी केला.[१५] त्यामुळे शेतकऱ्यांच्यात अन्यायाविरोधी आवाज उठविण्याची शक्ती निर्माण झाली. यातूनच पुढे बंगाल, बिहार, आंध्रप्रदेश, तामिळनाडू व पंजाब मध्ये शेतकऱ्यांनी आंदोलने केली.

**बंगाल, बिहार, आंध्रप्रदेश व तामिळनाडू मधील शेतकरी आंदोलने :**

काँग्रेस अंतर्गत समाजवादी पक्ष स्थापन करून त्याच पक्षाने भूमिहीन गरीब शेतकऱ्याला संघटीत करून त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी अनेक चळवळी केल्या. लढे उभारले. बंगाल व बिहार आणि आंध्रप्रदेशात शेतसारा कमी करावा. या मागणीसाठी बंगाल, बिहारमध्ये मोठे आंदोलन झाले. त्यामुळे जे जमिनदार कुळांना बेघर करीत, त्यांचे शोषन करीत त्यांच्या विरूद्ध लढा दिला गेला. सुंदरबन येथे शेतकऱ्यांच्या सर्व प्रकारचे करबंदीचे आंदोलन करणारे प्रतिसरकार स्थापन केले. जमिनदार व पोलीसांच्या अत्याचाराविरूद्ध बिहारमध्ये आंदोलने झाली. आंध्रप्रदेशात शेतकरी व शेतमजूर यांच्यात जमिनीसाठी संघर्ष फार काळ चालला. शेतमजूरांना योग्य शेतमजूरी मिळावी व जमिनदारी नष्ट व्हावी. म्हणून कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली लढे दिले. तसेच तामिळनाडू व पंजाबमध्ये शेतकऱ्यांनी जमिनदारीविरूद्ध आंदोलने केली.[१६] याबरोबरच आंध्रप्रदेश, केरळ, मद्रास, प्रांतात पी. कृष्णपिल्ले यांनी कुळांना संरक्षण मिळविण्यासाठी मोठा संघर्ष केला. आंध्रप्रदेशात पी. सुंदरय्या यांच्या नेतृत्वाखाली जमीनदार व इंग्रज सरकार विरूद्ध शेतकऱ्यांचे मोठे उठाव झाले. सन १९३९ साली आंध्रप्रदेश किसान सभेने शेतकऱ्यांचा मोठा लाँगमार्च काढून शेतकऱ्यांत जागृती घडवून आणली.[१७] ही सर्व पार्श्वभूमी पंजाबमधील शेतकऱ्यांना लाभली होती. यातूनच पुढे पंजाब मध्ये शेतकऱ्यांनी आंदोलने केल्याचे दिसून येते.

**पंजाबमधील शेतकऱ्यांचे आंदोलन :**

बंगाल, बिहार आणि केरळ या राज्यांप्रमाणे पंजाबमधेही शेतकरी आंदोलने झाली. पंजाब प्रांतात किसानांची अकाली सभा अस्तित्वात आली. जालंदर, अमृतसर, लाहोर, फरिदकोट येथे शिख शेतकरी व शेतमजूर संघटीत झाले. त्यांनी जमिनदार व सरकारच्या धोरणाविरूद्ध मोठे आंदोलन केले. मास्टर हरिसिंग, भगतसिंग, विलग, बालमोहनसिंग इत्यादी नेत्यांनी किसानांच्या चळवळीचे नेतृत्व केले. वाढीव पाणीपट्टीत

शेतसाऱ्यात झालेली वाढ, शेतमालाला मिळणारा कमी भाव या विरूद्ध पंजाबी शेतकऱ्यांनी लढे दिले.[१८]

अशा प्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळात भारतामध्ये आंदोलने झाली. या काळानंतरही शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यासाठी आंदोलने होत राहीली. त्यामध्ये १९४९ साली तामिळनाडू येथे शेतकऱ्यांचे आंदोलन झाले. तसेच कर्नाटक मध्ये १९७० साली श्रीनिवास गुड्डी व बी. व्ही. कक्कीळापा या दोन कम्युनिस्ट नेत्यांनी शेतकरी आंदोलने केली. तर ही आंदोलने होत असताना दुसऱ्या बाजूस १९६० च्या दशकात भारतात हरितक्रांती झाली. तिचे विविध परिणाम शेतकऱ्यांवर झाले.

**१९६० च्या दशकात झालेली हरित क्रांती :**

स्वातंत्र्य काळानंतर १९६० च्या दशकात भारतात हरित क्रांती झाली. तिचे प्रमुख कारण शेती विषयक संशोधन होय. या संशोधनात जादा उत्पादन मिळवून देणाऱ्या पीकांचे प्रकार शोधले गेले व कोणती खते वापरावी याची माहिती दिली गेली. तसेच आश्चर्यकारक बी-बियाण्यांचा शोध लावून त्याचे उत्पादन घेतले गेले. तसेच पाणीपुरवठ्यासाठी विहिरींची संख्या वाढवली. याबरोबरच शेतकऱ्यांना खते, बी-बियाणे, आधुनिक यांत्रिक अवजारे घेण्यासाठी कर्जे उपलब्ध करून दिली गेली. त्यामुळे हरित क्रांतीचे अनेक परिणाम दिसू लागले. हरित क्रांतीमुळे अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण झाला. हरित क्रांतीमुळे शेतकऱ्यांचे शेती हे उपजीविकेचे साधन आहे. हा दृष्टीकोन बदलून तो शेती हा चार पैसे मिळवून देणारा किफायतशीर व्यवसाय आहे असा झाला. तसेच शेतीत गुंतवणूक करण्याचे प्रमाण वाढत गेले. त्यामुळे असे दिसून येते की, १९६० च्या दशकातील हरित क्रांतीच्या कार्यक्रमामुळे शेतीच्या भांडवलीकरणास गती मिळाली. आणि त्यामुळे श्रीमंत शेतकरी वर्गाची सत्ता अधिकच मजबूत झाली. हरित क्रांतीने सिंचन सुविधा उपलब्ध असणाऱ्या भागांमध्ये सुबत्ता आणल्यामुळे प्रादेशिक स्तरावरील आर्थिक विषमता अधिकच वाढली. त्याप्रमाणे

काळाच्या ओघात गरिब शेतकरी व शेतमुजरांची संख्या वाढत गेली. त्यामुळे गरीब व श्रीमंत शेतकरी यांच्यातील विषमतेची दरी वाढत गेली.

हरित क्रांतीमुळे शेती उत्पादनात वाढ झाली त्यामुळे बाजारात मोठ्या प्रमाणात शेतीमाल येऊ लागला. त्यामुळे शेतीमालाचे दर घसरण्याची शक्यता निर्माण झाली. दर घसरण झाल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या श्रमाचा व गुंतवणूकीचा मोबदला मिळत नाही. परिणामी उत्पादन घटू नये म्हणून सरकारने विविध शेतमालाच्या योग्य किंमती निश्चित केल्या. व त्या किंमती शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला मिळतील अशी व्यवस्था केली. त्यामुळे शेतमालाचे उत्पादन वाढले. आणि त्याचा पुरवठा प्रचंड प्रमाणात वाढला होता.[१९] म्हणजेच हरिक्रांतीने शेती क्षेत्राच्या उत्पादन प्रक्रियेवर नव्हेतर संपूर्ण ग्रामिण जीवनात अमुलाग्र परिवर्तन घडवून आणले. एस. पुरी यांच्या मतानुसार, "बराच काळ सुप्त अवस्थेत राहिलेल्या ग्रामिण जनतेत राजकीय सक्रियता येऊन शेतकऱ्यांचा राजकीय सहभाग वाढला."[२०] हरितक्रांतीने शेतकऱ्यांच्यात चेतना निर्माण केली. आपल्या अधिकारासाठी शेतकरी वर्ग आंदोलनाचा मार्ग स्विकारू लागला. हरितक्रांतीने शेतकऱ्यांस आत्मभान दिले. या आत्मभानाची अभिव्यक्ती म्हणजे शेतकरी आंदोलने होय.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर व हरितक्रांतीनंतर शासनाच्या धोरणाकडे पाहता औद्योगिकरणास झुकते माप व शेती क्षेत्राचे शोषण असे एकूण चित्र उभे राहिले. शेतीमालाचा तुटवडा असताना लेव्ही आणि मुबलकता असताना निर्यात बंदी, राज्यबंदी, तालूकाबंदी आणि गरज नसताना चढ्या भावाने आयात केली जात होती. यातून शेतकऱ्यांचे नुकसान होत होते. १९७८ साली देशाच्या प्रगतीसाठी 'शेतकऱ्यांनी आपला व्यवसाय जीवन सोसून करावा' असे शेतकऱ्यांना आव्हान करण्यात आले. शासनाची दुटप्पी शोषण निती अशा विविध धोरणातून दिसून येत होती.[२१] अशा

शोषणकारी नितीचा विरोध करण्यास विविध संघटनांच्या नेतृत्त्वाखाली शेतकरी एकत्र येऊन शेतकरी आंदोलन आकारास आले. अशाप्रकारे शेतकरी आंदोलन आकारास आले असताना भारतामध्ये पंचायतराज व्यवस्थेत शेतकऱ्यांचा राजकीय सहभाग आणि राजकीय जागृती वाढली होती. या कालावधीतच जयप्रकाश नारायणांचे संपूर्ण क्रांतीचे तत्त्वज्ञान भारतभर प्रसार पावले होते. याच विचाराच्या भूमिकेतून जनतेने राष्ट्रीय आणीबाणीस विरोध केला. जनतेला अन्याय, शोषण यांचा प्रतिकार करणे पुरक ठरले. १९७० चे दशक शेतकरी वर्ग व शेतकरी कार्यकर्त्यांना शेतकरी शक्तीची जाणीव करणारे ठरले. कारण या दशकाच्या उत्तरार्धात म्हणजे २३ डिसेंबर १९७९ रोजी चौधरी चरणसिंग यांनी दिल्ली येथे भव्य शेतकरी मेळावा आयोजित केला. पुढे १६ फेब्रुवारी १९८१ रोजी इंदिरा गांधींनी, २३ मार्च १९८१ रोजी प्रमुख विरोधी पक्षांनी शेतकरी मेळाव्याचे आयोजन केले. यातून शेतकऱ्यांना समूळ शक्तीची जाणीव झाली. व राजकारणातील आपले महत्त्व कळाले. ही शेतकरी वर्गातील नवी जाणीव शेतकरी आंदोलनात परावर्तीत झाली.

भारतातील शेतकरी आंदोलनाची ही पार्श्वभूमी महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलनास लाभली होती. या पायावरच पुढे महाराष्ट्रात शेतकरी आंदोलनाचा उदय झाला.

**महाराष्ट्रातील आंदोलनाचा उदय :**

भारताच्या इतिहासाला, राजकारणाला आणि समाजकारणाला महाराष्ट्राने आपल्या वैचारिक व कृतीशिल बळाच्या आधारावर नेहमीच दिशा दिली आहे. नवीन शेतकरी आंदोलनाच्या संदर्भातही प्रभावीपणे ही भूमिका महाराष्ट्राने बजावली आहे. महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलन विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात प्रा. एन. डी. पाटील व शरद जोशी यांच्या नेतृत्त्वाखाली झाली.

**प्रा. एन. डी. पाटील यांनी केलेली शेतकरी आंदोलने :**

महाराष्ट्रामध्ये प्रा. एन. डी. पाटील यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आंदोलने केली. 'देशाची अर्थव्यवस्था शेतमालाच्या किंमतीचा प्रश्न ऐरणीवर आणण्यासाठी १९७० साली प्रा. एन. डी. पाटील यांनी 'शेती मालाच्या किफायतशीर किंमतीची कैफियत' ही पुस्तिका लिहिली. ही पुस्तिका म्हणजे शेती आणि शेतकऱ्यांच्या स्वयंपुर्णतेचा जाहिरनामाच आहे.[२२] प्रा. एन. डी. पाटील यांनी विदर्भातल्या शेतकऱ्याच्या आणि एकंदरित सर्वच शेतकऱ्यांच्या नित्य आणि अस्पर्शित मागण्यासाठी शेगांव ते नागपूर १७ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर १९८० रोजी शेतकरी दिंडी काढली.

या दिंडीतील शेतकऱ्यांच्या मागण्या पुढीलप्रमाणे —

१) शेतीमालाला किफायतशीर भावाची हमी द्या.

२) शेतकऱ्यांची सर्व कर्जे रद्द करा.

३) रोजगार हमी योजना कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करा.

४) शेतमजुरांना निवाऱ्याची आणि जीवनमानाची हमी द्या.

५) शेतकरी, शेतमजुरांना पेन्शन योजना लागू करा.

६) कामगार विरोधी काळे विधेयक मागे घ्या.

७) महागाईला आळा घालून भ्रष्टाचार निपटून काढा.

८) बेकारांना काम किंवा रू. ५००/- बेकार भत्ता द्या.

९) मंडल आयोग लागू करा.

१०) ओला दुष्काळ जाहिर करून तातडीने मदत द्या.

या मागण्या मांडल्या. तर या शेतकरी दिंडीचे भरत वाक्य होते. ते म्हणजे 'घाम गाळूनही आपल्या जीवनाची माती झाली, त्याचे सोने करण्यासाठी लढूया.'[२३] याप्रकारे शेतकरी दिंडी काढली. याचा परिणाम म्हणजे पेन्शनची मागणी मान्य केली. आणि अन्य तितक्याच महत्त्वाच्या मागण्यांसाठी समिती नेमली गेली. याबरोबरच

प्रा. एन. डी. पाटील यांनी जागतिकीकरण विरोध कृती समितीद्वारे शेतकरी कामगारांच्या परिषदा घेतल्या. या मार्गाने प्रा. एन. डी. पाटील यांनी शेतकऱ्यांना संघटीत करण्याचे प्रयत्न केले. याबरोबर महाराष्ट्रात शरद जोशी यांनीही शेतकऱ्यांचे दारिद्र्य दूर होण्यास विविध प्रयत्न केले. त्यामध्ये त्यांनी प्रथम स्वत: शेती करून पाहिली. शेती करत असताना शेतीसमोर येणाऱ्या समस्या, उत्पादन समस्या, उत्पादन खर्च आणि त्यानंतर शेतमालास मिळणारा दर या सर्वाचा अनुभव त्यांना आला. यातूनच शेती व शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आवाज उठविण्यास त्यांनी सुरूवात केली. यासाठी प्रथम त्यांनी शेतकऱ्यांना संघटीत करण्यावर भर दिला व शेतकऱ्यांना संघटीत करून त्यांच्या मागण्या मांडण्यासाठी, समस्या सोडविण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून शेतकरी संघटनेची स्थापना केली व त्याद्वारे विविध आंदोलने केली ती पुढीलप्रमाणे आहेत.

**१९७८ ते १९८० चा कांद्याचा लढा :**

१९७८ साली शरद जोशींनी कांद्याचा लढा उभारला. शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाला पाहिजे. तो मिळविणे शेतकऱ्यांचा श्रमसिद्ध हक्क आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना एकत्रीत आणण्यावर भर देण्यात आला. कांद्याच्या भावाबद्दल इशारा देताच शासनाने मार्केटमध्ये ४० ते ५० रूपये प्रतिक्विंटल कांदा खरेदी सुरू केली. १९७९ साली कांद्याचा भाव सरकारने ४० रूपये प्रतिक्विंटल जाहिर केला. तेव्हा शेतकरी संघटनेद्वारे शेतकऱ्यांचा पहिला लढा कांद्याच्या भावाच्या प्रश्नावर चाकण येथे १९८० साली सुरू झाला. सटाणा, चाकण, नाशिक, लासलगांव आणि पुण्याच्या काही भागात कांद्याचे फार मोठे उत्पादन होते. देशाला लागणारा कांदा त्यापैकी $^3/_4$ कांदा या भागातून पाठविला जातो. १९८० साली सरकारने नांदेडमधील कांदा खरेदी केला नाही. त्यामुळे एकदम कांद्याचे पिक बाजारात आले. परिणामी भाव कमी झाले. चाकण येथे बाजारात कांद्याचा भाव हा प्रतिक्विंटलला १७ रूपये पर्यंत

घसरला.[२४] कांद्याचे भाव पडले मात्र शेतकऱ्यांचे कांदा उत्पादन थांबले नव्हते. १९ मार्च १९८० रोजी निफाड तालूक्यातील पिंपळगाव बसवंत भागातील शेतकऱ्यांनी विक्रीस आणलेल्या कांद्याच्या गाड्या रस्त्यावर आडव्या उभ्या करून मुंबई-आग्रा रोड रोखला. या लढ्याचे नेतृत्व माधवराव खंडेराव मोरे यांनी केले.[२५] हा लढा यशस्वी झाला नाही. पण या लढ्यामुळे शेतकऱ्यांमध्ये जागृती घडून आली. आणि होणाऱ्या अन्यायाविरोधात लढण्यास शेतकरी तयार झाले.

**ऊस आंदोलन १९८० :**

ऑगस्ट ते नोव्हेंबर १९८० या दरम्यान मुख्यत: नाशिक जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ऊसाला अधिक भाव मिळावा यासाठी आंदोलन केले. व त्यासाठी साखर कारखान्यांना ऊस न देण्याचा ठराव केला. या ही आंदोलनात 'रस्ता रोको', 'रेल रोको' या तंत्राचा वापर करण्यात आला. पण शांततामय आंदोलनावर पोलीसांनी बळाचा वापर केल्यावर आंदोलक शेतकऱ्यांपैकी दोन शेतकरी गोळीबारात ठार झाले. अनेक शेतकऱ्यांना अटक झाली यामूळे आंदोलन प्रकाश झोतात आले. शरद जोशींनी याही आंदोलनात उपोषण सुरू केले. नोव्हेंबर १९८० मध्ये महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी ऊस आंदोलकांची ऊस आंदोलकांची ऊस-भावाची मागणी मान्य केली.[२६] व हे आंदोलन बंद मागे घेण्यात आले.

**तंबाखु आंदोलन १९८१ :**

मार्च १९८१ मध्ये तंबाखु उत्पादक शेतकऱ्यांनी व्यापारी व शासनाच्या धोरणाविरूद्ध आंदोलन झाले. या आंदोलनातही 'रास्ता रोको' हे मुख्य तंत्र अवलंबिण्यात आले. कर्नाटक सरकारने बळाचा वापर करून आंदोलन मोडून काढण्याचा प्रयत्न केला. हजारोंना अटक केली. गोळीबार करण्यात आला. त्यामध्ये १२ शेतकरी मरण पावले. त्यानंतर सरकारने आंदोलकांची मागणी मान्य केली.[२७] यानंदर हे आंदोलन थांबविण्यात आले.

**१९८२ चे दुध आंदोलन :**

नाशिक, सांगली, पुणे आणि औरंगाबाद येथे २२ जून १९८२ मध्ये दुधाचे भाव वाढवून घेण्यासाठी हे आंदोलन झाले. यात शहरातील दुधाचा पुरवठा थांबवणे हे आंदोलनकर्त्यांचे प्रभावी अस्त्र राहिले होते. मात्र हे आंदोलन यशस्वी झाले नाही.[२८]

**१९८६ चे कापूस आंदोलन :**

नोव्हेंबर-डिसेंबर १९८६ मध्ये शेतकरी संघटनेने कापूस आंदोलन उभे केले. विदर्भातील नागपूर चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, अकोला आणि बुलढाणा हे जिल्हे व मराठवाड्यातील नांदेड व परभणी जिल्ह्यांत 'रास्ता रोको' करण्यात आले. हजारो शेतकऱ्यांना अटक करण्यात आली. आंदोलनाच्या पूढच्या टप्प्यात मात्र शांततामय, गांधीवादी पद्धतीने धरणे धरून विरोध दर्शविला गेला.[२९] आणि शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करून घेण्यात आल्या.

**१९८८-८९ चे कर्जमुक्ती आंदोलन :**

शेतमालाला रास्त भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांची लूट होते. व शेतकऱ्याला घेतलेले कर्ज फेडणे अशक्यच बनते. म्हणून शेतकऱ्यांनी नादारी म्हणून घोषित करून कर्जमुक्त होण्यासाठी हे आंदोलन उभारले. हजारो शेतकऱ्यांचे कर्जमुक्तीचे अर्ज न्यायालयात दाखल करण्यात आले. पुढे केंद्र सरकारने व राज्य सरकारने कर्जमाफीची योजना मंजूर केली. या दशकात ऊस, दुध, कापूस आणि तंबाखू ही आंदोलने झाली.[३०]

शरद जोशी शेतकऱ्यांच्या परिस्थितीची मांडणी करताना म्हणतात की, देशातील लहान मोठी शहरे म्हणजे 'इंडिया' तर ग्रामिण जनता म्हणजे 'भारत' आहे. इंडिया भारताचे सतत शोषण करीत आहे. थोडक्यात शहरी भाग हा ग्रामिण भागाचे (शेतकऱ्यांचे) शोषण करीत आहे. असे शरद जोशी यांचे मत आहे. आणि म्हणून समग्र भारत शोषणमुक्त करण्यास शेतकरी आंदोलन उभे राहिले आहे. या शेतकरी

आंदोलनाचे उद्दिष्ट शेतकऱ्यांचा फायदा करणे नसून गरीबी हटविणे हे आहे. आणि शेतकरी संघटनेचा एककलमी कार्यक्रम म्हणजे शेतमालास रास्त भाव मिळाला पाहिजे हा आहे. ही भूमिका शरद जोशींची राहिली आहे. त्यांच्या शेतकरी संघटनेचा नारा 'शेतकरी तितुका एक एक' असा होता.

अशाप्रकारच्या विचारसरणीचा स्विकार करणाऱ्या शेतकरी संघटनेने महाराष्ट्रात मोठे जनआंदोलन उभारून त्यास जनसामर्थ्य प्राप्त करून दिले. तसेच शेतकरी आंदोलनाच्या इतिहासात १९८० ते ९० चे दशक खऱ्या अर्थाने 'शेतकऱ्यांचे दशक' म्हणून ओळखले जाते. या काळातील शेतकरी आंदोलने शेतीच्या मुलभूत प्रश्नांवर आणि शेतीविषयक धोरणातील परिवर्तनावर केंद्रीत झाली होती. या काळात ग्रामिण विरूद्ध शहरी, शेती विरूद्ध कारखानदारी अशी द्वंद्वे उभी करून शेतकऱ्यांमध्ये वर्गभेद निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. शेतकरी आंदोलनाचा हा पोत व आशय नवीन वळणाने जाणारा असल्याने या आंदोलनास 'शेतकरी आंदोलन' म्हणून संबोधले जाते. स्वातंत्र्यपूर्व काळातील आंदोलने ही असाह्य शेतसारा अवाजवी खंड व वाढते अत्याचार, शोषण याविरूद्ध उभी राहिली होती. स्वातंत्र्योत्तर काळातील दोन दशकातील शेतकरी आंदोलनाची मुख्य उद्दिष्ट्ये सावकारी नष्ट करणे, जमिनदारी व जमीन सुधारणा अंमलात आणने ही होती. शेतकरी आंदोलनाचे वेगळेपण व नवेपण त्यांच्या आंदोलनात व मागण्यांत दिसून येते. शेतीमालाला वाढीव भाव मिळावा, शेतीमालाला हमीभाव मिळावा आणि शेतीस लागणाऱ्या आदानांच्या किंमती कमी करणे या आंदोलनातील प्रमुख मागण्या होत्या. शेतकरी आंदोलनाने वैचारिक प्रबोधनातून सामाजिक विषमतेवर मात करून 'शेतकरी तितुका एक एक' अशा घोषणा करत शेतकरी संघटनेच्या विकासात्मक वाढीकडे लक्ष दिले जात होते. महाराष्ट्रातील ग्रामिण भागात शेतकऱ्याला एकाच छत्राखाली आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला. शेती मालाला रास्तभाव मिळाले तर अल्पभूधारक, शेतमजुर, छोटा-मोठा शेतकरी या सर्वांचा लाभ होणार आणि रास्त भाव मिळावा ही मागणी सर्वांच्या हितसंबंधांची प्रगटीकरण

करणारी आहे. म्हणून या नव शेतकरी आंदोलनात वर्गसंकल्पना ही गैरलागू ठरविण्यात आली. त्यामुळे शेतकरी आंदोलनास व्यापकता प्राप्त झाली. एका बाजूला शेतकऱ्यांच्या शोषणास शासन जबाबदार आहे म्हणून शासनाचा निषेध शेतकरी आंदोलन करते. तर दुसऱ्या बाजूस शासनास धोरण बदलण्यासाठी जनवादी आंदोलन उभे केले जाते. शेतकरी आंदोलन हे अराजकीय होते. हे या आंदोलनाचे वैशिष्ट्य आहे. यापूर्वीची आंदोलने मात्र राजकीय पक्षाशी संबंधित होती. थोडक्यात नवशेतकरी आंदोलनाचे स्वरूप पाहता आपणास असे म्हणता येईल की, भ्रमनिरास, अस्वस्थता, असंतोष, शासन संस्थेची उदासिनता अशा पार्श्वभूमीवर आमचे प्रश्न आम्ही सोडवू हा बाणा ठेवून स्वयंप्रेरणेवर १९८० च्या दशकात ही आंदोलने उभी राहिली. एकाच वेळी भारताच्या विविध प्रांतात, वेगवेगळ्या संघटना, नेतृत्त्व यांच्या छत्राखाली भारतीय शेतकरी एकजुट होत होता. महाराष्ट्रातील शरद जोशींच्या छत्राखाली शेतकरी वर्ग संघटीत झालेला होता.

पण हा बदल पार काळ राहिला नाही. पुढे १९९० च्या दशकात भारताने जागतिकीकरणाचा स्विकार केला. त्यामध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाऱ्यावर सोडून दिले गेले. मुक्त बाजारपेठेवर सर्व मदार टाकण्यात आली. स्वातंत्र्यानंतर नियमित भांडवलीशाहीवर सरकार व सार्वजनिक कल्याण या दोन प्रमुख मर्यादा होत्या. त्यामुळे गरीब-श्रीमंत, शहरी-ग्रामीण, कष्टकरी शेतकरी यासारख्या स्पर्धांना वाव होता. पण १९९० नंतरच्या अनियमित भांडवलशाहीवर सरकार व सार्वजनिक कल्याण या दोन मर्यादा पुसट झाल्याने, शासन व भांडवलशाही स्वतंत्र पठरीवर धावू लागले. परिणामी शासनाचा सार्वजनिक हितबुद्धीवर मर्यादा पडू लागल्याचे दिसून येते. त्यामूळे शेतीक्षेत्रावरील अरिष्ट अधिकच गंभीर झाली. त्यातच या काळात शासनाचे धोरणे शेतकऱ्यांबद्दल फारसे अनुकूल दिसून येत नव्हते. महाराष्ट्रात शरद जोशींच्या नेतृत्त्वाखाली राजू शेट्टी शेतकरी आंदोलनात कार्यरत होते. शरद जोशींच्या नेतृत्त्वाखाली आंदोलने करत असताना राजू शेट्टी यांनी शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार

करताना १९९६ रोजी कोल्हापूर येथे 'ऊस झोनबंदी' विरोधी आंदोलने केली व त्यानंतर ७ नोव्हेंबर २००२ रोजी प्रतिटन ऊसाला पहिला हप्ता रू. ८००/- मिळावा. या आंदोलनामुळे २९ नोव्हेंबर २००२ रोजी प्रतिटन रू. ७५०/- पहिला हप्ता मिळाला. मात्र १९८० च्या दशकात शेतकरी आंदोलनाचे नेतृत्त्व करणारे शरद जोशी एक राजकीय पक्षाचा (भा.ज.पा.) आधार घेतात. आणि त्यातूनच अशा वातावरणात महाराष्ट्रात शेतकरी संघटनेत फूटीची बीजे पेरली गेली. या काळात राजू शेट्टी यांनी शेतकरी संघटनेतून बाहेर पडून 'स्वाभिमानी शेतकरी संघटना' स्थापन केली. व या संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर विविध लढे दिले. त्यामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी राजू शेट्टी यांनी सातत्याने जनआंदोलने केली. याशिवाय दुध दरवाढ, शेतकरी, शेतमजुर, कामगार यांच्या प्रश्नांबद्दल विधानसभेत चर्चा करणे. त्याचप्रमाणे १६ ऑक्टोबर २००५ मध्ये राजू शेट्टी यांनी ऊस परिषद घेतली. अशा परिषदांमधून शेतकऱ्यांना एकत्रीत करणे. त्यांचे प्रश्न समजावून घेणे व त्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम त्यांनी केले. त्यामधे प्रामुख्याने ऊस आंदोलने केली कारण दक्षिण महाराष्ट्रात ऊसपीकासाठी सुपीक जमिन आहे. पुरेसा पाणी पुरवठा होतो. त्यामुळे येथे ऊसाचे पीक जास्त प्रमाणात घेतले जाते. त्यामुळे ऊसास उत्पादन खर्चावर आधारित भाव घेण्यासाठी शेतकरी आंदोलने झाली आहेत. ऊस आंदोलनाबरोबर दुध दरवाढी संदर्भातही राजू शेट्टी यांनी आंदोलने केली आहेत. कारण शेती व्यवसायास जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसायाकडे पाहिले जाते. मात्र या दुधास योग्य दर मिळत नव्हता. त्यासाठी विविध आंदोलने झाली. २००६ मध्ये भोगावती, जि. कोल्हापूर येथे पहिली दुध परिषद घेतली. या परिषदेस शेतकरी व महिलांचा प्रचंड सहभाग होता. दुध आंदोलने करण्याचे कारण सांगताना ते म्हणतात की, "दुध व्यवसाय हा तोट्यात चालत होता. दुधास शेतकरी जरी अमृत म्हणत असला; तरी दुध उत्पादकांना दुधाचा मिळणारा दर परवडणारा नव्हता. त्यामुळे ह्या दुधास शेतकरी विष समजत आहेत."[३१] राजू शेट्टींनी घेतलेली दुध परिषद म्हणजे दक्षिण महाराष्ट्रातील दुध दरवाढीचे ऐतिहासिक आंदोलन असे आपणास म्हणता येईल.

राजू शेट्टी यांनी दक्षिण महाराष्ट्रात ऊस व दुग्धोत्पादक शेतकऱ्यांची आंदोलने करत असताना शेतकऱ्यांचे प्रश्न जाणून घेतले. व या मागण्या साखर कारखानदार, दुधसंघ, शासन यांच्या समोर मांडल्या व त्यावर आंदोलने करून काही प्रमाणात या मागण्या मान्य करून घेतल्या. तसेच राजू शेट्टी यांनी सामाजिक प्रश्नांवरही लढे दिले आहेत. जुलै २००५ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात महापुरामूळे प्रचंड वित्तहानी व जीवितहानी झाली. त्यांना मदत कार्य व पुनर्वसनासाठी प्रयत्न केले. महापुरामूळे पीकांचे झालेले नुकसान व पशुधनाचे झालेले नुकसान या भरपाई मिळावी म्हणून आंदोलने केली. या आंदोलनाचे फलित म्हणजे शासनाने ५३ कोटी मदत जाहिर केली.

दक्षिण महाराष्ट्रातच नव्हे तर संपुर्ण भारत देशामध्ये ६५% जनता शेती व्यवसाय करत आहे असे असून सुद्धा शेतकऱ्यांच्या शेतमालास योग्य भाव मिळत नाही. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असतानाही शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्यासारखे सावट उभे राहिले आहे. आणि शेतकऱ्यांनी केलेल्या विविध आंदोलनाचा सखोल अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत शोधप्रबंधात 'दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक व दुग्धोत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन' विशेष संदर्भ - २००७ (सांगली, कोल्हापूर) या विषयाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

**विषयाचे महत्त्व :**

भारतामध्ये आजपर्यंत मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांची विविध आंदोलने झाली. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातही कापूस, कांदा, तंबाखु, ऊस आणि दुध यांच्या योग्य भावासाठी आंदोलने झाली. या आंदोलनाचा परिणाम शासनावर पाहिजे तेवढ्या प्रमाणात झालेला नव्हता. परंतु दक्षिण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी केलेल्या ऊस व दुध आंदोलनाचा परिणाम शासनावर झाला. त्यामुळे या दक्षिण महाराष्ट्रातील ऊस व दुग्धोत्पादक शेतकऱ्यांना यश प्राप्त झाले. आणि याचा फायदा संपुर्ण महाराष्ट्राला झाला.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये :**

१) दक्षिण महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलने व चळवळींचा आढावा घेणे.

२) अभ्यास क्षेत्रातील आंदोलनाची पार्श्वभूमी तपासणे.

३) स्वत:च्याच पीकांच्या व दुधाच्या पैशासाठी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्याला व्यवस्थेशी कसे झगडावे लागते याचा सटीक अभ्यास करणे.

४) या आंदोलनाच्या यशापयशाची चिकित्सक मीमांसा करणे.

**संशोधन पद्धती :**

'दक्षिण महाराष्ट्रातील ऊस उत्पादक व दुग्धोत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन' विशेष संदर्भ-२००७ (सांगली, कोल्हापूर) या विषयाचा अभ्यास करण्यासाठी क्षेत्रीय संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. हा विषय अभ्यासण्यासाठी राजू शेट्टी, शेतकरी संघटनेचे पदाधिकारी, यांच्या मुलाखती तसेच सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील निवडक सहकारी साखर कारखान्यातील पदाधिकारी व दुध संघातील पदाधिकाऱ्यांच्या मुलाखती व शेतकऱ्यांच्या मुलाखती Random Sampling पद्धतीने घेण्यात आल्या आहेत.

**माहितीचे संकलन :**

प्रस्तूत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक साधनांमध्ये शासनाचे अहवाल, सहकारी साखर कारखान्यांचे अहवाल आणि सहकारी दुध उत्पादक संघांचे अहवाल यांचा वापर करण्यात आला आहे. तसेच दुय्यम साधनांमध्ये वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेट यावरील माहिती, या विषयासंबंधीची चर्चासत्रे, शोधनिबंध या दुय्यम माहिती साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**आजपर्यंत झालेले संशोधन :**

१) महात्मा ज्योतिबा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा असूड' प्रस्तुत ग्रंथामध्ये ब्राह्मण, सावकार आणि ब्रिटीश शासन शेतकऱ्यांची पिळवणूक करतात. शेतकरी व शेतीची यांचे विवेचन, सरकारने शेती व शेतकऱ्यांसाठी कोणकोणते उपाय सुचवावेत याबद्दल लेखन केले आहे.

२) प्रा. एन. डी. पाटील 'व्यक्तीत्व आणि कर्तृत्व' प्रस्तुत पूस्तकामध्ये प्रा. विश्वास सायनाकर यांनी शेतकरी संघर्ष चळवळ, शेतकरी दिंडी, जागतिकीकरण, शेती आणि शेतकरी या विषयांवर लेखन केले आहे.

३) प्रा. य. व. जीते 'लढा भूमीपूत्राचा' प्रस्तुत पुस्तकामध्ये शेतकऱ्यांचे विविध पीकांसाठी झालेले लढे शेतकरी संघटनेची स्थापना आणि शरद जोशींच्या विचारांचा आढावा घेतला आहे.

४) डॉ. अशोक चौसाळकर 'महाराष्ट्र राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन परिषद' राज्यशास्त्र पत्रिका, १९९३ यामध्ये शेतकरी संघटनेची तात्विक भूमिका, शरद जोशींचे आंदोलन विषयक विचार यांची चर्चा केली आहे.

५) टी. जी. पवार यांनी 'A Study of Tobacco Growers' Agitation at Nipani-1981 या प्रस्तूत अप्रकाशित शोधप्रबंधामध्ये भारतातील तंबाखु उत्पादक, त्यांची पार्श्वभूमी, तंबाखू उत्पादकांच्या समस्या या बद्दल लेखन केले आहे.

६) डी. व्ही. पाटील 'क्रांतिसिंह नाना पाटील आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा प्रश्न' (१९२० ते १९५२) या प्रस्तूत शोधप्रबंधात क्रांतिसिंह नाना पाटील जीवन परिचय, त्यांचे शेतकऱ्यांबद्दलचे विचार, १८७७-७८ चा महाराष्ट्रातील दुष्काळ, दख्खनचे दंगे व महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या प्रश्नाचा आढावा घेतला आहे.

मा. आमदार राजू शेट्टी यांनी स्वत:ची स्वाभिमानी शेतकरी संघटना स्थापन करून शेतकऱ्यांचे विविध प्रश्न सोडवण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ऊस व दुध हे महत्त्वपूर्ण विषय हाताळण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी त्यांनी प्रसंगानुरूप अहिंसात्मक मार्गाने व प्रसंगानुरूप हिंसक मार्गानी ऊस व दुध आंदोलने केलेली दिसून येतात. ऊस आंदोलनासाठी १३ दिवसांची 'निर्धार यात्रा' व ४ दिवसांचे 'दुध बंद आंदोलन' केलेले दिसून येते. ऊस व दुध हे शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न 'स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या' माध्यमातून सोडविण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला दिसून येतो. आणि हा केलेला प्रयत्न आपण पुढील प्रकरणांत पाहणार आहोत.

## संदर्भ सूची


१) पाटील डी. व्ही. – 'क्रांतिसिंह नाना पाटील आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा प्रश्न' १९२० ते १९५०, एम.फिल. अप्रकाशित शोधप्रबंध, १९५२, पृष्ठ क्र. ११.

२) उपरोक्त – पृष्ठ क्र. ८.

३) डॉ. फडके य. दि. – 'महात्मा जोतिराव फुले', समग्र वाङ्मय महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,१९६९, पृष्ठ क्र. ६.

४) उपरोक्त – पृष्ठ क्र. २३५.

५) प्रधान ग. प्र. – 'स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत', साधना प्रकाशन, पुणे-४११०३०, पृष्ठ क्र. ४१.

६) डॉ. पवार जयसिंगराव – 'हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर-४१६०१२, पृष्ठ क्र. ४८.

७) उपरोक्त – पृष्ठ क्र. ४९.

८) डॉ. ए. वाय. जाधव – 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक आणि राजकीय विचार', पीएच.डी. शोध प्रबंध, पृष्ठ क्र. ३७५.

९) उपरोक्त – पृष्ठ क्र. ५३.

१०) सावळे दत्ता – 'चंपारण्य लढा : गांधीजींचे तंत्र व लोक', शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-२००७, पृष्ठ क्र. १९.

११) उपरोक्त – पृष्ठ क्र. ४४.

१२) डॉ. कुंभार नागोराव – 'सत्याग्रह म. गांधीजींचा दृष्टीकोन', प्रबोधन प्रकाशन, शिवनगर, लातूर-२००७, पृष्ठ क्र. ६३, ६४.

१३) प्रा. जीते य. रा. 'लढा भूमीपूत्राचा' कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद-१९९३, पृष्ठ क्र. १४.

१४) प्रधान ग. प्र. – 'स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत' साधना प्रकाशन, पुणे-४११०३०, पृष्ठ क्र. १८१.

१५) प्रा. जीते य. रा. – 'लढा भूमीपूत्राचा' कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद-१९९३, पृष्ठ क्र. १५.

१६) उपरोक्त – पृष्ठ क्र. ३२, ३३.

१७) उपरोक्त – पृष्ठ क्र. १५.

१८) उपरोक्त – पृष्ठ क्र. १५.

१९) प्रा. ठक्कर के. एच. – 'भारतीय अर्थशास्त्र', फडके प्रकाशन, कोल्हापूर-१९९२, पृष्ठ क्र. ८९.

२०) पुरी एस – 'भारतीय राजनितीक व्यवस्था', न्यू ॲकॅडमीक पब्लिकेशन, जालंधर, पृष्ठ क्र. २९६.

२१) शिरशीकर व. म. – 'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. २४९.

२२) प्रा. सायनाकर विश्वास – 'प्रा. एन. डी. पाटील व्यक्तीत्व आणि कर्तृत्व', डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा-२०००, पृष्ठ क्र. २५.

२३) उपरोक्त – पृष्ठ क्र. ८१.

२४) प्रा. जीते य. रा. – 'लढा भूमीपूत्राचा', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपूरा, औरंगाबाद-१९९३, पृष्ठ क्र. १९.

२५) उपरोक्त – पृष्ठ क्र. ४६.

२६) पेंडसे अरूणा – 'भारतीय अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदल व शेतकरी संघटना', समाज प्रबोधन पत्रिका, ऑक्टोबर-डिसेंबर-२००७, पृष्ठ क्र. ४५५.

२७) उपरोक्त – पृष्ठ क्र. ४५५.

२८) प्रा. जीते य. रा. – 'लढा भूमीपूत्राचा', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगपूरा, औरंगाबाद-१९९३, पृष्ठ क्र. ८४.

२९) पेंडसे अरूणा – 'भारतीय अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदल व शेतकरी संघटना' समाज प्रबोधन पत्रिका, ऑक्टोबर-डिसेंबर-२००७, पृष्ठ क्र. ४५५.

३०) उपरोक्त – पृष्ठ क्र. ४५५.

३१) आ. शेट्टी राजू – प्रत्यक्ष मुलाखत